महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/उपसहायक(गोपनीय)आ.कक्ष/०१/२०२६, मुंबई दि.११/०२/२०२६

**विषयः- पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य यांचे आज्ञांकित कक्षाबाबत..**

***** ***** *****

**परिपत्रक**

मा.पोलीस महासंचालक यांनी दिलेल्या सुचनेनूसार कळविण्यात येते की, पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या काही अडीअडचणीसाठी मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी आज्ञांकित कक्षामध्ये व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे / समक्ष भेटण्यासाठी खालील प्रमाणे वेळ निश्चित करण्यात येत आहे.

| **अभ्यांगत** | **भेटीची दिवस** | **भेटीची वेळ** |
|---|---|---|
| पोलीस अधिकारी / अंमलदार (आ.कक्ष) | शुक्रवार | १६.०० ते १८.०० वाजेपर्यंत |

महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग १ प्रशासन मधील नियम ४१२ नुसार मा.पोलीस महासंचालक यांना आज्ञांकित कक्षामध्ये भेटण्यासाठी खालील कार्यप्रणालीचा अवलंब करावा.

१) ज्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचा आज्ञांकित कक्ष घ्यावयाचा आहे, त्यांनी त्यांचे अर्ज समर्थनीय कारणांसह प्रथम घटक प्रमुखांमार्फत या कार्यालयास पाठवावेत.

२) घटक प्रमुख यांनी सदर अर्जाची छाननी व सत्यता पडताळुन त्यावर घटक प्रमुख स्वत:चे स्पष्ट अभिप्राय लिहुन सदर अर्ज या कार्यालयाचे क्र.पोमसं/उपसपोमनि (गोपनीय) आज्ञांकित कक्ष/२०२१, दि.२५/०२/२०२२ सोबतच्या सेवाविषयक तपशिल विवरणपत्रात अचूक भरुन उप सहायक (गोपनीय) यांचे ई ऑफीसवर पाठवावेत.

३) घटक प्रमुखांकडुन अर्जाची छाननी व सत्यता पडताळुन घटक प्रमुखांच्या स्पष्ट अभिप्रायासह अर्ज प्राप्त झाल्यानंतर निवड झालेल्या अर्जदारांना पोलीस महासंचालक, म.राज्य, कार्यालयाकडून प्रत्यक्ष किंवा व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे आज्ञांकित कक्षात हजर राहण्याबाबत ई ऑफीसद्वारे दिनांक व वेळ कळविण्यात येईल.

४) पोलीस घटक प्रमुख यांनी व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे होणाऱ्या सुनावणीच्या वेळी संबंधीत पोलीस अधिकारी / अंमलदार यांना व्हीडीओ कॉन्फरन्सींग सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ती व्यवस्था करावी.

५) याबाबत काही शंका अडचण असल्यास उप सहायक (गोपनीय ) यांच्याशी संपर्क साधावा.

तरी, सर्व पोलीस घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, सदरहू बाब त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे निदर्शनास आणून देण्यात यावी.

**( सुप्रिया पाटील यादव )**

**मा.पोलीस महासंचालक,म.राज्य यांचे मान्यतेने**

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना )

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरीता.

**प्रत माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाही करीता :-**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)

२/- आयुक्तांना विनंती करण्यांत येते की, त्यांनी त्यांचे आस्थापनेवरील एक राखीव पोलीस निरीक्षक दर्जाचा अधिकारी आज्ञांकित कक्षाकरिता पोलीस महासंचालक म.राज्य,कार्यालयात वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्याबाबत स्पष्ट सुचना देण्यात याव्यात.

महासंचालक (न्यायीक व तांत्रीक), महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
महासमादेशक,गृहरक्षक दल, महाराष्ट्र राज्य, मुबई
महासचांलक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,महाराष्ट्र राज्य,मुंबई.(सस्नेह)
पोलीस महासंचालक,लोहमार्ग,महाराष्ट्र राज्य,मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक,गुन्हे अन्वेषण विभाग,महाराष्ट्र राज्य,पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना / कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक / विशेषकृती / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य,मुंबई
आयुक्त,.राज्य गुप्तवार्ता विभाग,महाराष्ट्र राज्य,मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक,व संचालक,महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक दळणवळण,माहिती तंत्रज्ञान व परिवहन,महाराष्ट्र राज्य,पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक,व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य,मुंबई./ मोटार परिवहन विभाग,पुणे / नक्षल विरोधी अभियान नागपूर / सागरी सुरक्षा महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके),महाराष्ट्र राज्य,मुंबई
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल,पुणे व नागपूर
विशेष पोलीस महानिरीक्षक, मा. राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक व मुख्य दक्षता अधिकारी,म्हाडा, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, व मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,मुंबई
सचिव (विषेश), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक,विशेष कृती दल,सुराबर्डी,अमरावती रोड,नागपूर.
प्राचार्य,गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र,नाशिक
सर्व प्राचार्य,पोलीस प्रशिक्षक केंद्र.
सर्व समादेशक,राज्य राखीव पोलीस बल,गट क्र.१ ते २०
सहायक पोलीस महानिरक्षक (का.व.सु./ दक्षता / धोरण / नि.व स.) महाराष्ट्र राज्य,मुंबई
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी,का.क्र.१ ते ४४
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ स्वीय सहायक

<u>प्रत माहिती करिता :-</u>

पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण, कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उपअधीक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू परिपत्रक या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावे.